[वेळ : 3.00 तास ] [गुण : 100 ]

कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** 'भाषांतर' आणि 'रूपांतर' या दोन संकल्पना विस्ताराने समजावून द्या. २०

**किंवा**

**ब.** 'अनुवाद' ही संकल्पना स्पष्ट करून अनुवादकाच्या भूमिकेबद्दलची चर्चा करा.

**प्र. २ अ.** भाषांतरामध्ये येणाऱ्या भाषिक समस्यांच्या स्वरूपाची चर्चा करा . २०

**किंवा**

**ब.** शैलीच्या चार अंगांचा परिचय करून देऊन 'भाषांतर आणि साहित्यप्रकार' हा अनुबंध स्पष्ट करा.

**प्र.३ अ. 1-इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** १०

Nature is an important and inseparable part of mankind. It is the greatest blessing for human life; however, nowadays humans fail to recognize it as one. Nature has been an inspiration for many poets, writers, artists and many others. This remarkable creation inspired them to write poems and stories in its splendor. They truly appreciated nature which is reflected in their works even today. Nature is a very beautiful gift from God. To conserve nature, we must take immediate and drastic steps to prevent further damage. The most important step is to stop deforestation at all levels. Cutting down trees has serious consequences in various sectors. This can easily lead to soil erosion and a large reduction in rainfall.

**किंवा**

**२. हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.**

*बेरोज़गारी उस स्थिति को संदर्भित करता है जहां सक्रिय रूप से रोजगार की इच्छा रखने वाला व्यक्ति नौकरी प्राप्त करने में असमर्थ रहता है।*

पिछले 10 वर्षों में भारत की बेरोज़गारी दर में उतारचढ़ाव आया है। यह विभिन्न - कारकों से प्रभावित होता है, जैसे आर्थिक स्थिति, सरकारी नीतियाँ और जनसांख्यिकीय परिवर्तन। भारत में बेरोज़गारी दर फरवरी 2023 में बढ़कर 7.45% हो गई, जिससे देश में बेरोजगारों की कुल संख्या 33 मिलियन हो गई। बेरोज़गार लोगों की संख्या कम करने के लिए भारत सरकार को समर्पित प्रयास करने की आवश्यकता है।

लोगों को कौशल प्रदान करना, बेहतर शिक्षा, श्रमप्रधान क्षेत्रों पर अधिक ध्यान केंद्रित - करना आदि सहित एक व्यापक दृष्टिकोण अपनाकर भारत बेरोज़गारी दर को काफी हद तक कम करने में सक्षम हो सकता हैं। बेरोज़गारी को कम करने के लिए सरकार के अलावा, निजी क्षेत्र और नागरिक समाज भी महत्त्वपूर्ण भूमिका निभा सकते हैं। निजी क्षेत्र रोजगार के अवसर



XSAGARDADMINY773D47XSAGARDADMINY773D47

पैदा कर सकता है, जबकि नागरिक समाज बेरोज़गारों को कौशल विकास और रोजगार सहायता प्रदान कर सकता है।

**ब.** 1. **मराठी उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.** १०

छ. शिवाजी महाराज हे युगपुरूष होते. त्यांनी स्वतःचे संपूर्ण जीवन हे स्वराज्य निर्मितीसाठी वाहून घेतले. त्यांचा आणि महाराष्ट्राचा संपूर्ण इतिहास पाहता आपल्याला कळून येते की स्वराज्य हे शून्यातून निर्माण केलेले राज्य होते.

शिवकालीन राज्यकारभाराची भाषा मुख्यत्वे फारसी होती. ही किंवा ती भाषा चांगली किंवा वाईट नसते. पण लोकांना फारसी समजत नव्हती. साहजिकच न समजणाऱ्या भाषेतील राज्यकारभार रयतेला आपला वाटत नव्हता. काय चालते कळत नव्हते. शिवाजी राजानी विचारपूर्वक राज्यभाषा कोश करायचे काम सुरू केले. मराठीत कारभार सुरू केला. तो लोकांना आपला वाटू लागला. शिवाजी राजांचे राज्य लोकांना आपले राज्य वाटू लागले.

**किंवा**

२. **मराठी उताऱ्याचे हिंदीमध्ये भाषांतर करा.**

प्रवासवर्णन देशांतर्गत असो वा विदेशांचे असो, त्यामागे रसिकतेची दृष्टी नसेल तर लेखनात केवळ वृत्तांत कथनाचा वस्तुनिष्ठपणा येतो. असे लेखन माहितीपर असते. पण रसवत्तापूर्ण होत नाही. प्रतिभाशाली लेखक अपरिचिताचे परिचित दर्शन घडविण्याची प्रत्ययकारी किमया करतो. सामान्य माणसाने टिपलेली ढोबळ माहिती व लेखकाच्या संवेदनशील मनाने टिपलेली त्या स्थळासंबंधी सर्वांगीण माहिती यांत खूप अंतर असते. प्रवासवर्णनात स्थळवर्णन तेथील निसर्ग, ह्या बाह्यांगाप्रमाणे तेथील संस्कृती दर्शन, ऐतिहासिक या अंतरंगालाही महत्त्व असते. प्रवासातील विविध अनुभव व्यक्त करताना लेखकाचे त्यावरील चिंतन व भाष्य यालाही महत्त्वाचे स्थान असते.

**प्र. ४ अ.** 'पारिभाषिक शब्द' म्हणजे काय ते सांगून 'युनेस्को'ने पारिभाषिक शब्दाची जी लक्षणे सांगितलेली आहेत ती स्पष्ट करा. २०

**किंवा**

**ब.** 'कोश' ही संकल्पना स्पष्ट करून कोश रचनेच्या पद्धती नमूद करा.

**प्र.५** पुढीलपैकी कोणत्याही **दोन टिपा** लिहा. २०

**अ.** अर्वाचिनीकरण संकल्पना

**ब.** ललित साहित्याच्या भाषांतरातील शैलीविषयक समस्या

**क.** इंग्रजी भाषेचे रचनाविशेष

**ड.** सूची वाङ्मयाचे स्वरूप

*****************



XSAGARDADMINY773D47XSAGARDADMINY773D47